(२)

(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/२०११/सभा-११९/(६)/आ.४ दिनांक :२४ मार्च २०११

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (प्रशासन व वित्त), मुंबई-२१.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (तांत्रिक) मुबंई- २१

विषय : दि.१७.२.२०११ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११९ व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुरुवार दि.१७.२.२०११ रोजी झालेल्या ११९ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

**सोबत : ११९ व्या सभेचे इतिवृत्त.**

आपली विश्वासू,

(उ.) महाजन

(उषा प्रं. महाजन)

मुख्य प्रशासकीय अधिकारी

२



१. वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा. नवी मुंबई.

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या कार्यक्रमबाब क्र. ३,५,६,७, व आयत्यावेळची बाब क्र.२ व आयत्या वेळची चर्चा क्र.१ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), म.जी.प्रा. मुंबई.

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या कार्यक्रमबाब क्र. ४ व आयत्यावेळची बाब क्र.१ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

३. उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

४. आस्थापना अधिकारी (द.) म.जी.प्रा. नवी मुंबई.,

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या कार्यक्रमबाब क्र.२ व आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र.३ व ४ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

५. प्रशासकीय नि आस्था. अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र.८ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

६. कायदा व कामगार अधिकारी, म.जीप्रा., नवी मुंबई.

७. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी/ कार्यासन अधिकारी यांच्या माहितीसाठी.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११९ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११९ वी सभा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक १७/२/२०११ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. श्रीमती मालिनी शंकर, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री.हेमंत चं. लांडगे, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, ठाणे
२. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नाशिक
३. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, पुणे
४. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री.व्ही.एन. राठोड, मुख्य अभियंता, (अतिरिक्त कार्यभार) म.जी.प्रा.प्रादे. विभाग, नागपूर.
६. श्री.सु.रा. भोसले, वि.स. व मु.ले.अ. (अतिरिक्त कार्यभार), म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.
८. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११८ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

**दिनांक २९.९.२०१० रोजी संपन्न झालेल्या ११८ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.**

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११८ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २९/९/२०१० रोजी संपन्न झालेल्या ११८ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. ११८ व्या बैठकीतील आयत्या वेळची बाब क्र.२ वरील चर्चेच्या वेळेस मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी असे सुचविले की, म.जी.प्रा.ची मालमत्ता अतिक्रमणापासून वाचविणे अत्यंत आवश्यक आहे, त्यादृष्टीने सर्व मुख्य अभियंता यांनी लक्ष घालावे. तसेच म.जी.प्रा.च्या मालमत्तेचा "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" या तत्वावर विकास करुन, म.जी.प्रा.ची आर्थिक परिस्थिती सुधारावी व म.जी.प्रा.साठीही योग्य मालमत्ता राखून ठेवावी याबाबतही मुख्य अभियंता यांनी लक्ष घालणे आवश्यक आहे.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत मा. सदस्य सचिव यांनी बैठकीमध्ये उहापोह केला. या संदर्भात सविस्तर चर्चा होऊन दिनांक २२.९.२०१० ते ११.२.२०११ या कालावधीत अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : कुडवा व कटंगीकला गावासाठी एकत्रित ( पेरी अर्बन) पाणी पुरवठा योजना ता.जि. गोंदिया ही योजना प्राधिकरणाची योजना म्हणून राबविणे, लोकवर्गणीची रक्कम मजीप्रा मार्फत उभारणे व आकृतीबंधास मान्यता देणे.**

सदस्य सचिव यांनी याबाबत असे सूचित केले की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अभियान कार्यक्रमांतर्गत कुडवा व कटंगीकला गावासाठी एकत्रित (पेरी अर्बन) पाणी पुरवठा योजना, ता.जि. गोंदिया ही योजना म.जी.प्रा. ची योजना म्हणून राबविणे, लोकवर्गणीची रक्कम म.जी.प्रा. मार्फत उभारणे व आकृतीबंधास मान्यता देण्याबाबतची कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या सर्व अध्यक्ष, सहअध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांच्याकडे चक्रीपध्दतीने फिरवून त्यास याआधीच मान्यता घेण्यात आली आहे.

सबब ही बाब संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर करण्यांत येत आहे. सदर बाबीस मा. संचालक मंडळाने सहमती दर्शविली.

**कार्यक्रम बाब क्र.५ : मजीप्राच्या मालकीच्या प्रकल्प क्षेत्रातील (अंबरनाथ-बदलापूर) व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा पुनर्आढावा.**

मा. सदस्य सचिव यांनी सदर कार्यक्रम बाबीबाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन सादर केलेल्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, दि.१ जून २०१० पासून पुर्वलक्षी प्रभावाने पुढे नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाण्यासाठी पाणी दराची आकारणी करण्यात यावी.

प्रकल्प क्षेत्राअंतर्गत

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा दर |
|---|---|---|
| १. | **घाऊक पाणी पुरवठा** | |
| अ] | घरगुती | ८.०० |
| ब] | बिगर घरगुती | ३३.०० |
| २. | **विषेश ग्राहक** | |
| | आयुध निर्मित कारखाना | १८.१५ |

**(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)**

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा वापर पहिल्या १५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर १५००१ ते २०००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २०००१ ते २५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ लि. च्यापुढे |
|---|---|---|---|---|---|
| ३. | **किरकोळ पाणी पुरवठा** | | | | |
| | **i) घरगुती (नागरी व पेरी अबर्न भागासाठी** | **८.३५** | **९.२०** | **१२.५०** | **१६.७०** |

**(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)**

| | | |
|---|---|---|
| | **ii) बिगर-घरगुती** | **३८.१०** |
| ४. | **शाळा,महाविद्यालय,धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा** | **१८.१५** |

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**[दोन] मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या व चालू असलेल्या नळ जोडण्यासाठी प्रतिमहा किमान दर रुपयात.**

ज्या नळ जोडावर मापनयंत्र बसविले असतील परंतु घर बंद असल्यामुळे त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रति माह | उपरोक्त [४] मध्ये निर्विर्दिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडास प्रतिमाह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडास प्रतिमाह |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १५ मिलीमिटर | १५४ | ३५८ | ६८८ |
| २० मिलीमिटर | २८१ | ६५५ | १२७१ |
| २५ मिलीमिटर | ४१३ | ८१४ | १८४३ |
| ३२ मिलीमिटर | ६११ | १४२५ | २७३४ |
| ४० मिलीमिटर | १०६२ | २४८१ | ४७७४ |
| ५० मिलीमिटर | १३४८ | ३१२४ | ६०३९ |
| ६५ मिलीमिटर | १६५० | ३८३९ | ७४०९ |

**[तीन] जलमापन यंत्र बंद असलेल्या नळ जोडणीस किमान आकार प्रति महा प्रति नळ जोडास [दर रुपयात] :**

सर्व नळजोडावर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यांत यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | घरगुती | उपरोक्त एक [४] मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणा-या या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिलीमिटर | २०९ | ४१३ | ९१३ |
| २० मिलीमिटर | ३५८ | ७१५ | १६१७ |
| २५ मिलीमिटर | ७३७ | १४७४ | ३३०० |

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[चार] **सार्वजनिक नळ खांबः**

सध्या सार्वजनिक नळ खांबे नाहीत आणि यापुढे नवीन नळ खांब मंजूर करण्यात येऊ नये.

[पाच] **ठोक पुरवठयासाठी किमान आकारः**

ठोक पुरवठयाच्या बाबतीत किमान मासिक आकार करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील तथापि असे किमान आकार दरमहा २ दश लक्ष लिटर्स पाणी पुरवठयासाठी प्रत्येक जोडणीमागे घेण्यात येणा-या आकारापेक्षा कमी असता काम नये.

[सहा] **त्वरीत प्रदानाकरीता रिबेटः**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील विभाग ४४[अ] अन्वये देयक वितरीत झालेपासून १५ दिवसांचे आंत देयकाचे प्रदान ग्राहकाने करणे आवश्यक आहे. जे ग्राहक देयकाचे प्रदान १० दिवसांचे आंत करतील त्यांना देयकाच्या २% रिबेट देण्यांत येईल.

२. ज्या ग्राहकाकडे थकबाकी नाही अशा ग्राहकांना पुढील बारा महिन्याचे अंदाजित आकार आगाऊ भरतील त्यांना आगाऊ भरलेल्या रक्कमेवर पाच टक्के सूट देण्यात येईल. अंदाजित देयके मागील दोन महिन्याच्या सरासरी वापरावर असेल.

[सात] **विलंब आकारः**

जे ग्राहक देयक दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाण्याचे बील [थकबाकीसह] भरण्यास कसुर करील अशा ग्राहकांना देयक देण्यात आलेल्या दिनांकापासून १५ दिवसाचा कालावधीत संपेल त्या दिनांकापासून त्यांच्या सर्व रक्कमेवर [थकबाकीसह] दरमहा १ टक्के दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल. ग्राहकांने सतत सहा महिने विलंब शुल्काचा आकार भरणा करण्यास कसूर केल्यास त्याला होणारा पाणी पुरवठा बंद करण्यास तो पात्र ठरेल.

**प्रकल्प क्षेत्राबाहेरील**

**[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा**

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा दर |
|---|---|---|
| **१.** | **घाऊक पाणी पुरवठा** | |
| अ] | घरगुती | |
| i] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके परस्पर भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | ५.१० |
| ii] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके न भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | १०.२० |
| iii] | मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.लिटर पेक्षा जास्त पाणी घेणारे ग्राहक | १०.२० |

मा. अध्यक्ष, म.जी.प्रा      सदस्य सचिव

म.जी.प्रा

| | | |
|---|---|---|
| iv] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक घरगुती पाणी पुरवठा | ५.१० |
| **ब]** | **बिगर घरगुती** | |
| i] | बिगर घरगुती घाऊक | ५०.८० |
| ii] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक बिगरघरगुती पाणी पुरवठा | २४.८० |
| **क]** | **विषेश ग्राहक** | |
| | **लष्करी कारखान्यांना केलेला शुध्द पाणी पुरवठा** | |
| अ] | अंबाझरी | २०.६० |
| ब] | ओझर | २०.६० |
| क] | अणुशक्ती केंद्र तारापूर | २०.६० |

**(पाण्याचे दर रुपयात प्रति १००० लिटर)**

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा वापर १५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर १५००१ ते २०००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २०००१ ते २५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ च्यापुढे |
|---|---|---|---|---|---|
| ३. | **किरकोळ पाणी पुरवठा** | | | | |
| अ) | **घरगुती (नागरी व पेरी अर्बन भागासाठी)** | | | | |
| | **i)** निवासस्थाने | ११.२० | १२.३० | १६.८० | २२.४० |
| | **ii)**ग्रामीण भागासाठी किरकोळ पाणी पुरवठा ज्या ठिकाणी ४५ लि. (प्रतिदिनी प्रति माणसी) पाणी पुरवठा होत असलेल्या भागांमध्ये | ५.२५ | ७.८० | १०.४० | १३.०० |
| ४. | **गिरीस्थाने** | | | | |
| | **घरगुती** | १२.४५ | १८.७० | २५.०० | ३१.२५ |

**(पाण्याचे दर रुपयात प्रति १००० लिटर)**

| | | |
|---|---|---|
| ब). | **बिगर-घरगुती** | |
| | **i)** क वर्ग नगरपालिकेला क्षेत्राशिवाय इतर नगरपालिका क्षेत्रात केलेला बिगर घरगुती पाणी पुरवठा | ५०.८० |

मा. अध्यक्ष, म.जी.प्रा.
प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| ii) | क वर्ग नगरपालिका क्षेत्रात २ द.ल.लि. पर्यंत पाणी वापर करणा-या बिगर घरगुती ग्राहकासाठी पाणी पुरवठा | ३१.८० |
| ३. | **शाळा,महाविद्यालय,धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा** | २१.६० |
| ४. | गिरीस्थाने | |
| | **ii) बिगर घरगुती** | |
| | अ वर्ग हॉटेल्स | ९५.६० |
| | ब वर्ग हॉटेल्स | ७६.२० |
| | क वर्ग हॉटेल्स | ६४.१० |
| | इतर | ६४.१० |

काही ठिकाणी एकाच संकुलामध्ये अनेक सदनिका अथवा एकाच इमारतीमध्ये एकपेक्षा अधिक सदनिका/रहिवाशी राहत असतात. परंतु अशा संकुलांना/इमारतींना एक अथवा एकापेक्षा जास्त नळजोड दिलेले असतात अशा ठिकाणी कुटुंबनिहाय कशी आकारणी करावी याबाबत देखील शंका उपस्थित केल्या गेल्या आहेत. याबाबत असे नमूद करण्यात येते की अशा परिस्थितीत, संकुलाचा / इमारतीचा एकूण पाणी वापर भागिले कुटुंबाची संख्या असे करुन सर्व कुटुंबांना सम प्रमाणात आकारणी करावी लागेल.

[दोन] **मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यासाठी प्रति महा किमान दर रुपयात.**

ज्या नळ जोडावर मापनयंत्र बसविले असतील परंतू घर बंद असल्यामुळे त्यां बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[रुपये]

| नळ जोडा्चा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रति मास | | उपरोक्त [३] मध्ये निर्विदिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडास प्रतिमास | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडास प्रति मास |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| | शहरी | ग्रामीण | | |
| १५ मिलीमिटर | ११० | ५५ | २३१ | ५३९ |
| २० मिलीमिटर | २२६ | १०५ | ४५७ | १०६७ |
| २५ मिलीमिटर | ४२४ | २०४ | ९०८ | २१४० |
| ३२ मिलीमिटर | ६४४ | ३०८ | १३५३ | ३३०० |
| ४० मिलीमिटर | ८७५ | ४०७ | १८१५ | ४२६३ |
| ५० मिलीमिटर | ११०० | ५०६ | २२५० | ५३४१ |
| ६५ मिलीमिटर | १३९७ | ६४९ | २९३७ | ६९४१ |

[तीन] **मापन यंत्र बसविण्यात आलेल्या गिरीस्थानक जोडण्या प्रतिमहा प्रति जोडणी दर रुपयात:**

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडास प्रति मास | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रति मास | | | इतर ग्राहकांना बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रति मास |
|---|---|---|---|---|---|
| | | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १५ मिलीमिटर | १२७ | ११४४ | ८५८ | ६९९ | ५३९ |
| २० मिलीमिटर | २३१ | २२२२ | १६५० | ११८८ | १०७३ |
| २५ मिलीमिटर | ४५१ | ४४५० | ३३०० | २५१९ | २१४० |
| ३२ मिलीमिटर | ६२७ | ६७३२ | ५०८२ | ३७७३ | ३३०० |
| ४० मिलीमिटर | ९०८ | ८३८८ | ६६०६ | ४८९५ | ४२६३ |
| ५० मिलीमिटर | ११८८ | १११८२ | ८२६१ | ६०७८ | ५३४६ |
| ६५ मिलीमिटर | १५४० | १४६१४ | १०६७० | ७८९८ | ६९४१ |

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**[चार] किमान आकार दर प्रतिमाह प्रति जोडणी रुपयांत.:**

सर्व नळजोडावर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यांत यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | घरगुती | उपरोक्त एक [४] मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणा-या या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिलीमिटर | ३३० | ५०६ | १२७१ |
| २० मिलीमिटर | ५०६ | १००७ | २५४१ |
| २५ मिलीमिटर | ९७९ | २५४१ | ५१०४ |

**[पाच] गिरीस्थानकासाठी किमान आकार प्रतिमहा प्रति नळ जोडास[दर रुपयात]:**

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रति मास | | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडास प्रति मास | | |
|---|---|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १५ मिलीमिटर | २७५ | १२१ | २६६८ | १९६९ | १५५७ |
| २० मिलीमिटर | ५३९ | २३७ | ५७२० | ४२८५ | ३२१८ |
| २५ मिलीमिटर | १०६७ | ४६२ | १०३२४ | ७७५० | ६१०५ |

**[सहा] मापनयंत्र विरहित सार्वजनिक नळखांब्याच्या जोडण्यासाठी किमान आकार:**

अ]

| | | | |
|---|---|---|---|
| अ | १५ मिलीमिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. २०३५ प्रति मास |
| ब | २० मिलीमिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. ४८९५ प्रति मास |
| क | २५ मिलीमिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. १०४९३ प्रति मास |

**[ब]** जेथे सावजनिक नळ जोडणीस मापनयंत्र बसविण्याची व देखभालीची जबाबदारी ही मालकाची असेल, बसविलेले मापन यंत्र तीन महिन्यापेक्ष अधिक काळ ना दुरुस्ती असतील तर मागील तीन महिन्याचे सरासरी वापर किंवा मापन यंत्र नसलेल्या सार्वजनिक खांबा यापैकी जास्त असेल ते बील आकारण्यात येईल.

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[सात] **ठोक पुरवठयासाठी किमान आकार:**

ठोक पुरवठयाच्या बाबतीत किमान मासिक आकार करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील तथापि असे किमान आकार दरमहा २ दश लक्ष लिटर्स पाणी पुरवठयासाठी प्रत्येक जोडणीमागे घेण्यात येणा-या आकारापेक्षा कमी असता कामा नये.

[आठ] **त्वरीत प्रदानाकरीता रिबेट:**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील विभाग ४४[अ] अन्वये देयक वितरीत झालेपासून १५ दिवसांचे आंत देयकाचे प्रदान ग्राहकाने करणे आवश्यक आहे. जे ग्राहक देयकाचे प्रदान १० दिवसांचे आंत करतील त्यांना देयकाच्या २% रिबेट देण्यांत येईल.
२. ज्या ग्राहकाकडे थकबाकी नाही अशा ग्राहकांना पुढील बारा महिन्याचे अंदाजित आकार आगाऊ भरतील त्यांना आगाऊ भरलेल्या रक्कमेवर पाच टक्के सूट देण्यात येईल. अंदाजित देयके मागील दोन महिन्याच्या सरासरी वापरावर असेल.

[नऊ] **विलंब आकार:**

जे ग्राहक देयक दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाण्याचे बील [थकबाकीसह] भरण्यास कसुर करील अशा ग्राहकांना देयक देण्यात आलेल्या दिनांकापासून १५ दिवसाचा कालावधीत संपेल त्या दिनांकापासून त्यांच्या सर्व रक्कमेवर [थकबाकीसह] दरमहा १ टक्के दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल. ग्राहकांने सतत सहा महिने विलंब शुल्काचा आकार भरणा करण्यास कसूर केल्यास त्याला होणारा पाणी पुरवठा बंद करण्यास तो पात्र ठरेल.

**कार्यक्रम बाब क्र.६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे २००९-२०१० चे वार्षिक लेखे स्वीकृत होणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळण्याची सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यांत आली. सदर बाबीबाबत सदस्य सचिवांनी अवगत केले. सदर बाबीवर सर्वंकष चर्चेअंती सदर कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यांत येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

कार्यक्रम बाब क्र.७ : **सातारा नगरपरिषदेकडे पाणीपट्टी थकबाकीबाबत.. एकूण ३४ पैकी ३० नळ जोडण्या वगळता उर्वरित ४ जोडण्यांच्या दर आकारणीबाबत..**

**सातारा नगर परिषदेकडील पाणीपट्टी थकबाकीबाबतची कार्यक्रम बाब बैठकीत सादर करण्यात आली. यावर चर्चा होवून पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.**

ठराव :

**असा ठराव करण्यात येतो की, पुर्नरचित दरानुसार आकारणी केलेली पाणीपट्टीची मुळ रक्कम रु. ९,०१,४६,२९३/- सातारा नगरपरिषदेकडून दर सहामाहीत रु. १.५० कोटी या दराने वर्षाला रु. ३ कोटी प्रमाणे ३ वर्षात वसूल करण्यात यावे. याबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.**

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**असाही ठराव करण्यात येतो की, सातारा नगरपरिषदेकडून पाणीपट्टीची मुळ रक्कम रु. ९,०१,४६,२९३/- संपूर्णपणे वसूल झाल्यानंतर, नगरपालिकेस पाणीपट्टीवरील दिनांक ३१.१२.२०१० अखेरपर्यंतचा थकीत विलंब आकार रु.१२,१२,१०,८२३/- माफ करण्यात यावा.**

**कार्यक्रम बाब क्र.८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देणारे तज्ञ व अतिथी व्याख्यात्यांचे मानधनात वाढ करणेबाबत..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नाशिक येथे संशोधन व प्रशिक्षण केंद्र असून, त्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता तसेच प्रशासकीय कामकाजाचे प्रशिक्षण वर्ग घेतले जाते. शासनाच्या यशदा, पुणे या संस्थेमार्फतही प्रशिक्षण घेतले जाते. तेथील व्याख्यातास मानधनाचे सुधारित दर खालील प्रमाणे लागू केले आहेत.

अ) ९० मिनीटांच्या एका सत्रासाठी रु. ७५०/-

ब) पुढील ९० मिनीटांचे दुसरे सत्र असल्यास रु. ७५०/-
मात्र दोनपेक्षा जास्त सत्रे एकाच व्यक्तीने एकाच दिवशी घ्यावयाची असल्यास अधीक्षक अभियंता, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांच्या पुर्व परवानगीने घेण्यात यावीत.

क) संपूर्ण दिवसाच्या सत्रासाठी मर्यादित रु. २४००/-

याच धर्तीवर म.जी.प्रा. च्या नाशिक येथील संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील व्याख्यात्यास वरील प्रमाणे मानधनाचे सुधारित दर दिनांक १.४.२०११ पासून लागू करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली असून, पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र. १ : गोंदिया शहर पाणी पुरवठा योजनेची निविदा डी.आय. पाईप पुरवठयासह काढण्याबाबत.**

**सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले. मा.गोपालदास अग्रवाल यांनी, सध्या बाजारात आर.सी. पेक्षा सी.आय./डी.आय. पाईपांचे दर कमी असल्याने, गोंदिया शहर पाणी पुरवठा योजना व गोंदिया पेरीअर्बन टप्पा-१ (कटंगी कुडवा) योजनांच्या निविदा डी.आय. पाईप पुरवठयासह मागवाव्यात, अशी विनंती केली आहे.**

**सद्य:स्थितीत म.जी.प्रा.च्या धोरणानुसार नागरी/ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी म.जी.प्रा.ने आर.सी. द्वारे निश्चित केलेल्या पुरवठादारांकडून सी.आय./डी.आय. पाईप पुरवठा करण्यात येत आहेत. तथापि मा.गोपालदास अग्रवाल यांच्या विनंतीनुसार, एक विशेष बाब म्हणून गोंदिया पाणी पुरवठा व गोंदिया पेरीअर्बन टप्पा-१ (कटंगी कुडवा) या योजनांसाठी डी.आय. पाईपसह निविदा मागविण्यास मा.संचालक मंडळाची मंजुरी घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात आल्याचे अवगत केले.**

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

यावर चर्चा होऊन, पाईप पुरवठयासह निविदा मागविण्याचा विशेष बाब म्हणून निर्णय घेतल्यास अशी प्रथा पडण्याची शक्यता असल्याचे मा. उपाध्यक्ष यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे पाईप पुरवठयासाठी दर कराराच्या निविदा प्राप्त झाल्या असल्याने व त्याबाबत निर्णय घेण्यात येत असल्याने सदर बाब अमान्य करण्यांत येत असल्याचा निर्णय मा. संचालक मंडळाने घेतला.

आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र. २ : देहू पाणी पुरवठा योजना, ता. हवेली, जि. पुणे.
पाणीपट्टीचे दर कमी करण्याबाबत..

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीचा निर्णय मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या दिनांक २९.१२.२०१० च्या बैठकीत घेतला असल्याचे अवगत करण्यांत आले. याबाबत सखोल चर्चा करण्यांत येऊन खालील अटीच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यांत आली.

१) देहू पाणी पुरवठा केंद्रांतर्गत पाणीपट्टीची आकारणी रु. १३०/- प्रतिमाह करावी व पुढील सहा महिन्यात एकूण २००० नळजोड होतील, यासाठी ग्रामपंचायतीने विशेष प्रयत्न करावे व नजीकच्या भविष्यांत प्रत्येक कुटुंबाने नळजोड घेऊन मीटर बसविण्याबाबत ग्रामपंचायतीने ग्रामस्थांना आवाहन करावे व त्यासाठीचा आवश्यक तो ठराव ग्राम सभेने पारीत करावा.

२) सदरची आकारणी जानेवारी, २०११ पासून लागू राहील. त्याचप्रमाणे मागील थकबाकी व आकारणी यामध्ये कोणताही बदल करण्यांत येणार नाही. तसेच सदरचे पाणी पुरवठा केंद्र ग्रामपंचायतीने ताब्यात घेऊन चालवावे, म्हणजे पाणीपट्टीची आकारणीबाबत निर्णय घेण्यास ग्रामपंचायत सक्षम असेल.

आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र. ३ : बर्लिन जर्मनी येथे दिनांक १८ व १९ एप्रिल,२०११ रोजी होणाऱ्या वॉटर समिट २०११ मध्ये मा. मंत्री, पा.पु. व स्व. व मा. मंत्री, ग्राम विकास यांची उपस्थिती.

या कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव तथा प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी संचालक मंडळास अवगत केले. या विषयानुषंगाने मा. मंत्री महोदय यांनी असे सुचविले की, दिनांक १८ व १९ एप्रिल २०११ रोजी बर्लिन, जर्मनी येथे आयोजित केलेल्या पाणी परिषदेस मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा संचालक मंडळाचे अध्यक्ष, मा.मंत्री, ग्रामविकास तथा संचालक मंडळाचे सह-अध्यक्ष यांचे बरोबरच मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा. चे उपाध्यक्ष व मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांनीही उपस्थित रहावे, या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता दिली. तसेच या दौऱ्यासंदर्भात येणारा खर्च म.जी.प्रा.ने करण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यांस मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

OSD - [illegible] खर्चालाही मंजूरी देणे आवश्यक वाटते म्हणून देण्यात येत आहे

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

९५

९३

**आयत्यावेळची बाब क्र.४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिव (तां.) पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेबाबत.

यानुषंगाने प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांनी संचालक मंडळास असे सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सदस्य सचिव श्री. संजय दहासहस्त्र हे दि.३०.९.२०१० रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले आहेत. तेंव्हापासून सदस्य सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व. यांचेकडेच आहे. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या पदावरील नियमित नियुक्तीसाठी कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. त्याबाबतचा निर्णय होण्यास काही कालावधी लागणार असल्याने सदस्य सचिव (Technical) या पदाचा अतिरिक्त कार्यभार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ज्येष्ठतम मुख्य अभियंता श्री.आर.जी.होलानी, मुख्य अभियंता, औरंगाबाद यांचेकडे सोपविण्यांत येईल. सदस्य सचिव (प्रशासन) या पदाचा अतिरिक्त कार्यभार मात्र प्रधान सचिव, पा.पु. व स्व. वि. यांचेकडेच राहील असेही त्यांची संचालक मंडळास सांगितले.

संचालक मंडळाने यास मान्यता दर्शविली. या संदर्भातील पुढील कार्यवाही प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांनी करावयाची आहे.

**आयत्या वेळची चर्चा क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीतबाबत.**

दिनांक १७.२.२०११ रोजीचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळच्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना मंडळाचे आर्थिक परिस्थितीबाबत बैठकीमध्ये माहिती देण्याबाबत सूचीत केले त्यानुषंगाने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले.

जानेवारी २०११ अखेर महसुली जमा रु. २३३.१७ कोटी असून खर्च रु. २६३.२१ कोटी झालेला आहे. यामध्ये मुख्यत्वे करुन E&P द्वारे रु. ५५.१४ कोटी, पाणी विक्रीपो टी रु. ९९.४७ कोटी, तात्पुरत्या गुंतवणूकीवरील जमा व्याज रु. ४५.७६ कोटी, इतर मसहुली जमा रु. ३०.९८ कोटी आणि अहस्तांतरीत पाणी पुरवठा योजनांची जमा रु. १.८२ कोटी अशी जमा बाजू आहे.

महसुली खर्चाबाबत वेतन व भत्ते यावर खर्च रु. १४३.४६ कोटी निवृत्ती वेतन रु. ६२.०३ कोटी अहस्तांतरीत पाणी पुरवठा केंद्रावरील देखभाल व दुरुस्ती रु. ५.३९ कोटी, पाणी पुरवठा केंद्रावरील उच्च दाबाची देयके व पाटबंधारे देयके रु. ४३.०३ कोटी आणि म.जी.प्रा.ने उभारलेल्या कर्जावरील परतफेड रु. ७.३० कोटी असा एकूण खर्च रु. २६३.२१ कोटी असून जानेवारी २०११ अखेर महसुली तुट रु. ३०.०४ कोटी इतकी आहे.

सद्यस्थितीत खर्च भागविण्यासाठी अल्प मुदत ठेवीवरील व्याज आणि योजनांचा निधी वापरावा लागत आहे. या कारणास्तव अद्यावत तुट रु. ११०.९३ कोटी झालेली आहे. महसुली तुट मुख्यत्वे करुन निवृत्त वेतन खर्चामध्ये झालेली वाढ आणि अहस्तांतरीत पाणी पुरवठा केंद्रावरील खर्चामुळे तुट वाटत आहे.

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

म.जी.प्रा.ची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तातडीने पाऊले उचलणे आवश्यक आहे. म.जी.प्रा.ची थकबाकी शासनाने काही प्रमाणात अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन दिल्यास थोडी फार आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हातभार लागेल. या परिस्थितीमुळे म.जी.प्रा.तील कर्मचाऱ्यांना १० टक्के वाढील महागाई भत्ता तसेच सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करता आलेली नाही याबाबत संघटना आग्रही आहेत.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांनी सदरची परिस्थिती पाहता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचेसमवेत बैठक घेऊन उपाययोजनांबाबत चर्चा करणे उचित राहील असे सांगितले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

मा. अध्यक्ष, मजीप्रा तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.